महाराष्ट्र शासन

# अन्न नागरी व पुरवठा विभाग

## जिल्हा पुरवठा अधिकारी नाशिक, (पुरवठा शाखा)

जुना मुंबई आग्रा महामार्ग, मध्यवर्ती बस स्थानकाजवळ, नाशिक – 422002

फोन नं. 0253-2578276

( **Website** - www.nashik.gov.in, **E-Mail**-nashikdso@gmail.com)

# ई- निविदा सूचना

जिल्हा पुरवठा अधिकारी नाशिक यांचे कार्यालयास शिपाई पदांकरिता पुरवठा करण्यासाठी पात्र संस्थांकडून खालील प्रमाणे ई-निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.नं. | ई- निविदेचा तपशील | ई-निविदा शुल्क रुपये | बयाणा रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| 1. | जिल्हा पुरवठा अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक कार्यालयास कंत्राटी पध्दतीने शिपाई या पदांकिरता (45) मनुष्यबळ सेवा पुरविणेबाबत. (जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक +विभागीय आयुक्त कार्यालय) | (र.रु. 20,000 /-) अक्षरी रु. वीस हजार मात्र (विना परतावा) | (र.रु.2,00,000/) अक्षरी रुपये दोन लाख रू. मात्र |

1) ई निविदेबाबत सविस्तर माहिती www.mahatenders.gov.in व www.nashik.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
2) ई-निविदे संबंधी कागदपत्रे डाउन लोडींगसाठी दिनांक 20 / 05 /2026 रोजी सकाळी 11.00 वा. पासून उपलब्धआहेत.
3) प्री बीड मिटींग दिनांक 02 / 06 /2026रोजी सकाळी 11.00 वाजता मा.जिल्हाधिकारी,नाशिक यांचे दालनात होईल. काही कारणास्तव यातारखेत बदल झाल्यास नवीन तारीख वेबसाईटवर कळविण्यात येईल.
4) ई-निविदा ऑनलाईन दाखल करण्याची अंतिम मुदत दि. 29 / 05 /2026 सायं.05.00 वा.पर्यंतआहे.
5) तांत्रिक ई-निविदा संबंधि सादर करावयाचे कागदपत्रांचा तपशिल निवीदेत दिलेला असून ती सर्वद कागद पत्र स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करावीत.
6) ई-निविदा शुल्क व बयाना रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या पोर्टलवर जमा करण्यात यावी.
7) तांत्रिक निविदा दि. 05 / 06 /2026 रोजी अथवा तदनंतर जिल्हा पुरवठा अधिकारी,नाशिक (पुरवठा शाखा) येथे उघडण्यात येतील.

सदर ई-निविदा स्विकारणे/स्थगित करणे/नाकारणेचा अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांनी राखून ठेवलेला आहे.

(आयुष प्रसाद)
अध्यक्ष, जिल्हा पुरवठा समिती तथा
जिल्हाधिकारी नाशिक

जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक कार्यालयास कंत्राटी पध्दनतीने शिपाई सेवा पुरविणेबाबतची ई-निविदा
निविदाधारकाची माहिती.

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| 01 | निविदा धारकाचे नांव | |
| 02 | पत्र व्यवाहाराचा संपूर्णपत्ता | |
| 03 | **संपर्क** क्रमांक फोन/ मोबाईल | |
| 04 | ऑफिस | |
| 05 | ई.मेल आय डी | |
| 06 | संपर्कासाठी अधिकृत प्रतिनिधीचे नांव | |
| 07 | फोननंबर/ मोबाईल नंबर | |
| 08 | मालकाचे / **संचालक** भागीदारांची नांवे | |
| 09 | **संस्थेचा** नोंदणी क्र.<br>(शॉपअॅक्ट / कंपनी अॅक्टप्रमाणे) | |
| 10 | औद्योगिक रजिस्ट्रेशन नंबर | |
| 11 | सध्याचे लेबरलायसेन्स नंबर | |
| 12 | प्रॉव्हींडंट फंड कोड अकांऊट नंबर | |
| 13 | ई.एस.आय.सी.कोड नंबर | |
| 14 | व्यवसायकर नोंदणी नंबर | |
| 15 | कर्मचाऱ्यांची एकुण संख्या | |
| 16 | आयकर पॅन नंबर | |
| 17 | वैध GST रजिस्ट्रेशन नंबर | |

| अ.नं. | तपशील | इच्छुक निविदाधारकाने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| 18 | राष्ट्रीकृत बँकेचे नाव, शाखा बँकखातेनंबर | |
| 19 | आय.एफ.सी.कोड | |
| 20 | आर्थिक वर्ष सन 2022-2023, 2023-2024, 2024-2025 चे बॅलन्सशीट | |
| 21 | 2022-2023,2023-2024, 2024-2025 चे आयकर रिटर्न दाखल केले संबंधीचे पुरावे. | |

**विषयांकित निविदेतील अटी व शर्ती मला मान्य असून त्यास मी बांधील आहे.**

**ठिकाण:-**
**दिनांक:-**

**निविदा धारकाची स्वाक्षरी व शिक्का**

**प्रति,**
**मा.जिल्हाधिकारी नाशिक**

**जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक कार्यालयास कंत्राटी पध्दतीने शिपाई यांच्या सेवा पुरविणेबाबत.**
**ई-निविदेच्या अटी व शर्ती**

1. निविदाधारक संस्था ही कायद्यानुसार नोंदणीकृत असावी.
2. संस्था मनुष्यबळ पुरविणेस सक्षम असावी.
3. संस्थेकडे जी.एस.टी (G.S.T) नोंदणी आवश्यक आहे.
4. मागील 3 आर्थिक वर्षाचे आयकर भरलेले असावे.
5. शासकीय कार्यालयात मनुष्यबळ पुरविणे संबंधी किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
6. संस्थेकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाची प्रकारानुसार तपशीलवार माहिती जोडणे बंधनकारक आहे.
7. **कंत्राटी मनुष्यबळाची निवड करतांना मागणीनुसार पद संख्येच्या तीनपट उमेदवारांची यादी पुरविण्यात यावी. उमेदवारांच्या कागदपत्रांच्या छाननीनंतर सदर यादी पैकी 1/3 उमेदवार निवडण्याचे अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांचे अध्यक्ष खाली गठीत केलेल्या समितीस राहतील. त्याच उमेदवारांना संस्थेने आदेश देणे बंधनकारक राहील.**
8. निविदेत नमूद सर्व अटी व शर्ती निविदाधारकास मान्य असलेबाबत तसेच यापूर्वी संस्थेचा कोणत्याही ठिकाणी काळया यादीत समावेश नसलेबाबत विहीत हमीपत्र (रु.500/- चे बाँडपेपरवर) निविदेसोबत जोडणे आवश्यक राहील.
9. निविदाधारकाने निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी शर्ती, शासनाचे नियम / निर्देश तसेच परिपत्रक या व्यतिरिक्त स्वतःची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ट करु नये. तसेच सदर निविदा कामासाठी संयुक्त भागीदारी (Joint veuture) करता येणार नाही.
10. निविदाधारकाने निविदा फॉर्म भरतांना अटी व शर्ती यांचे काळजीपूर्वक वाचन करुन तदनंतर निविदा फॉर्म भरावा अपूर्ण माहिती असलेला फॉर्म तसेच उपरोक्त नमुद बाबींचे पुरावे सादर न केलेला निविदा फॉर्म बाद / रद्द करण्यात येईल.
11. निविदा उघडणेच्या वेळी मुळ कागदपत्रे व सदर कागदपत्रांचा एक झेरॉक्स संच सोबत आणावा.
12. **निवड झालेल्या संस्थेने सुरक्षा अनामत रक्कम (आदेशाच्या मुल्याच्या 3%) बँक गॅरंटीव्दारे जिल्हाधिकारी (पुरवठा शाखा) यांचेकडे 8 दिवसाचे आत जमा करावी. सदर अनामत रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही. तसेच बँकगॅरेंटीची मुदत संपण्याचे आत 15 दिवस अगोदर नूतनीकरण करुन देणे बंधनकारक राहील.**
13. निविदाधारक स्वतः, त्यांची संस्था अथवा त्यांनी नियुक्त केलेले कंत्राटी कर्मचारी हे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबधित अथवा गुन्हेगारी स्वरुपाचे नसावेत. निविदाधारक संस्था जिल्हयाबाहेरील असल्यास मुख्यालयाच्या ठिकाणी त्यांनी आपला अधिकृत प्रतिनिधी नेमावा लागेल व त्या प्रतिनिधीशी करण्यात येणारा सर्व पत्रव्यवहार संस्थेवर बंधनकारक राहील.
14. मंजूर निविदा धारकास सदरच्या कामाकरीता अदा करणेत येणाऱ्या सेवा व मानधन देयकामध्ये लागू असणारे भविष्य निर्वाह निधी (Employees' Provident Fund), विमा / ECIS, TDS, PT इ. संबंधित शिपाई यांच्या नावे त्या त्या EPF, ECIS, खाते उघडून त्यात भरण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. सदर देयकावरील रक्कम भरणा केलेल्या चलनांची एक प्रत दरमहा या कार्यालयास सादर करावी.
15. शासन व कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई पांनी वेळोवेळी शिपाई यांचे मानधनात बदल केल्यास त्याप्रमाणे त्यांना देय मानधन व त्याअनुषंगाने त्यांच्या भविष्य निर्वाह निधी, (Employees' Provident

Fund), विमा /ECIS, TDS, PT इ. मध्ये रक्कम भरणा करणे बंधनकारक असेल.

16. निविदा मंजुरीनंतर मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून सेवा पुरवठा विहित कालावधीत व उत्त गुणवत्तेने होणे गरजेचे आहे. कामाची गुणवत्ता राखण्यात नियुक्त पुरवठादार अयशस्वी होत असल्याचे निर्दशनास आल्यास, सदर संस्थेकडून काम काढून घेवुन जिल्हाधिकारी नाशिक निश्चित करतील अशी भरपाई रक्कम निविदाधारकास भरावी लागेल तसेच संस्थेस काळया यादीत टाकण्यात येईल.

17. कंत्राटी कर्मचारी यांना कोणत्याही अपघातामुळे अपंगत्व / जिवितास धोका इ.झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादार संस्थेची राहील, याबाबत जिल्हाधिकारी नाशिक यांचे कडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई किंवा मदत दिली जाणार नाही किंवा या संदर्भात कोणत्याही प्रकारचा फौजदारी, दिवाणी दावा करता येणार नाही.

18. कार्यालयीन अभिलेख माहिती यांची आवश्यक ती गोपनीयता पाळली जाईल, याची दक्षता संबधित पुरवठादार संस्थेने व कंत्राटी कर्मचारी यांनी घ्यावयाची आहे. कंत्राटी कर्मचारी यांची सचोटी, वर्तणूक व प्रामाणिकपणाबाबत तक्रार आल्यास नेमून दिलेल्या कामात विनाकारण खंड पडल्यास संबंधितास पुरवठादार संस्थेने तात्काळ कामावरुन कमी करणे व त्याऐवजी दोन दिवसाचे आत सक्षम उमेदवार उपलब्ध करुन देणे संस्थेस बंधनकारक राहील.

19. कंत्राटी मनुष्यबळाचे मासिक मानधनाची रक्कम शासनाकडून अदा करणेस विलंब झाल्यास किमान तीन महिन्यापर्यंत मानधन संबंधित शिपाई यांना अदा करणेची तजवीज संस्थेने करणे बंधनकारक राहील.

20. निवड झालेल्या निविदाधारांकास कामाचे आदेश प्राप्त होताच आठ दिवसात जिल्हा व मागणी प्रमाणे तहसिल स्तरावर मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. तसेच शासनाचे कामगार विभागाने ठरवून दिलेले मनुष्यबळ पुरवठा करणे संबधीचे नियम व आदेश, शासन निर्णय तसेच परिपत्रक यांचे पालन करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

21. निविदाधारकाने रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र/करार करुन दिले नंतरच कार्यारंभ आदेश निर्गमीत करण्यात येतील, तथापि, सदर कराराची मुदत कधीही व कोणतेही कारण न दाखविता संपुष्टात आणणेचे अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडेस राखून ठेवणेत येत आहेत.

22. निविदाधारकाची कामाची मुदत कार्यारंभ आदेशाचे दिनांकापासून 3 वर्षे राहील. संस्थेचे काम समाधानकारक वाटल्यास समितीचे निर्णयास अधिन राहून सदर मंजूर दराने कार्यादेशास पुढील 1 वर्ष व आवश्यकता असल्यास पुढे 1 वर्षापर्यंत मुदतवाढ देण्यात येईल.

23. संस्थेमार्फत घेतलेल्या कंत्राटी मनुष्यबळाची सेवा ही शासकिय सेवा समजणेत येणार नाही किंवा कंत्राटी पध्दनतीने शिपाई यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व जिल्हाधिकारी नाशिक व शासनावर राहणार नाही.

24. संस्थेमार्फत नेमलेले संस्थेचे कर्मचारी यांना नेमलेल्या पदांवर काम केल्यामुळे भविष्यात कोणत्याही प्रकारे शासनाच्या अथवा जिल्हाधिका-यांच्या आस्थापनेवर नियुक्ती मिळणार नाही किंवा ते या आस्थापनांवर हक्क प्रस्थापित करुन शकणार नाहीत. याची पूर्वकल्पना संबंधित संस्थेने त्यांच्या कर्मचाऱ्यास लेखी स्वरुपात देऊन त्यांची लेखी संमती घेणे बंधनकारक राहील.

25. कंत्राटी पध्दतीने शिपाई यांनी कोणतीही गैरवर्तवणूक केल्यास किंवा दैनंदिन कामकाजात अकार्यक्षमता दिसून आल्यास त्यास कामावरुन कमी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांना राहतील व त्याविरुध्द कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

26.संस्थेव्दारे सद्यस्थितीत सरासरी 42+3 शिपाई पुरविणे आवश्यक राहील. तथापि, शिपायांच्या

संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचा अधिकार, जिल्हाधिकारी नाशिक यांना राहील.

27. नियुक्त पुरवठादार यांनी पुरविलेल्या प्रत्येक कंत्राटी पध्दतीने शिपाई यांचा "विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण भवन, 264, पहिला मजला, कला नगर समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-400051 या कार्यालयाकडे विमा उतरविणे बंधनकारक राहील व विमा संचालनाकडे जमा केलेबाबत पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

28. मनुष्यबळासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाने निश्चित केलेली मानधनाची / मोबदला रक्कम समितीकडून संस्थेच्या खात्यावर एन.ई.एफ.टी./चेकव्दारे जमा करण्यात येईल. त्यानंतर संस्थेने निर्धारित केलेले मानधन/मोबदला कायदेशिर दायित्वासह संबंधित कंत्राटी कर्मचा-याच्या बँक खात्यामध्ये जमा करावे. मनुष्यबळाची पिळवणूक होणार नाही, याची दक्षता घ्यावी. यात कसूर केल्यास अनामत जप्त करणे, संस्थेकडून उर्वरीत रक्कम जमीन महसूल थकबाकी म्हणून वसूल करणे, संस्थेवर फौजदारी कारवाई करणे, संस्थेला काळया यादीत टाकणे अथवा संस्था नोंदणी रद्द करणे, अशी कारवाई करणेचे अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांना राहतील.

29. सेवा पुरवठादार संस्थेकडून कंत्राटी पध्दनतीने शिपाई यांना किमान रु. 16092/- व रू15424/- ( जिल्हास्तर व तालुकास्तर ) यामध्ये सर्व अनुज्ञेय असलेले किमान वेतन, भत्ते, भ.नि.नि., विमा इ. अंतर्भूत आहे.) प्रतिमाह इतका मोबदला देण्यात येईल. सदर रकमेमध्ये अंतर्भूत असलेल्या भ.नि.नि अंतर्गत कर्मचारी आणि संबंधित संस्था यांचा हिस्सा / भाग तसेच विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अदा करावयाची विमा रक्कम यांचा समावेश असून सदर रक्कम कपात करुन संबंधित आस्थापना (कर्मचारी निर्वाह निधी, विमा संचालनालय इ.) यांना जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरवठादार संस्थेची राहील. अशा सर्व वजाती / कपाती केल्यावर उर्वरीत रक्कम हि मानधन व अनुज्ञेय असलेले सर्व भत्ते म्हणून पुरवठादार संस्थेने कंत्राटी कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात जमा करणे व त्याचा पुरावा वरील कपातीसह पुढील महिन्याच्या मागणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

30. संबंधित संस्थेने दरमहा 7 तारखेचे आत पुरवठा केलेल्या मनुष्यबळा साठीचे देयक सादर करणे व देयका सोबत मनुष्यबळाचा दैनंदिन उपस्थिती अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत सादर करणे बंधनकारक राहील.

31. प्रचलित कामगार कायद्यात वेळोवेळी होणारे बदलांसह पालन करण्याची जबाबदारी निविदाधारक संस्थेची राहील.

32. निविदा मंजूर करणे, स्थगित करणे अथवा नाकारणे, अथवा अटी व शर्ती मध्ये अंशतः बदल करणे किंवा दरासंदर्भात तडजोड/ वाटाघाटी करणे इ. सर्व अधिकार जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडेस राखून ठेवणेत येत आहेत.

33. सदर निविदा/ कराराबाबत कोणताही कायदेविषय वाद उद्भवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र नाशिक राहील.

(आयुष प्रसाद)

**अध्यक्ष, जिल्हा पुरवठा समिती तथा**

**जिल्हाधिकारी नाशिक**

# तांत्रिक लिफाफा (फॉर्म क्र.1)

## -: निविदे सोबत मुळ प्रती अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी :-

LIST OF DOCUMENTS TO BE UPLOADED

| Sr.No | Name of Document |
|---|---|
| 1 | निविदा धारक विषयक माहिती. |
| 2 | ई-निविदा अंदाजित रक्कम रु. ----------------/- (अक्षरी ---------------------------------------- मात्र) . |
| 3 | निविदा शुल्क रक्कम रुपये ----------- अंदाजित रु. ------------ (विना परतावा) इंटरनेट बैंकींगव्दारे जमा केल्याची पावती. |
| 4 | बयाणा/इसारा रक्कम रुपये -----------/-(अक्षरी रुपये --------- रू.मात्र) इंटरनेट बँकींगव्दारे जमा केल्याची पावती. |
| 5 | पार्टनरशिप डिड (भागीदारी असल्यास)/Memorandum Articles of Association (प्रायव्हेट कंपनी असल्यास)/ घटनेची प्रत (सहकारी संस्था असल्यास) |
| 6 | नोंदणीकृत मुखत्यारपत्र /प्राधिकारपत्रकेले असल्यास त्याची प्रत जोडावी. |
| 7 | संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. (निवीदा कालावधीपर्यंत नुतणीकरण केलेले असावे) |
| 8 | पॅन कार्ड (संस्थेचे) |
| 9 | मागील तीन आर्थिक वर्षाचे म्हणजे 2022-2023, 2023-2024 व 2024-2025 चे आयकर रिटर्नस् (अनिवार्य) |
| 10 | PTRC & PTEC नोंदणी प्रमाणपत्र व त्याचे दिनांक 31/03/2025 पर्यंतचे भरणा केल्याचा दाखला किंवा चलन. |
| 11 | पी.एफ.कायद्याअंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र |
| 12 | ESIC नोंदणी प्रमाणपत्र |
| 13 | वैध GST प्रमाणपत्राची प्रत व GST भरणा प्रमाणपत्र |
| 14 | शासकीय तसेच अशासकीय कार्यालयांमध्ये / संस्थांमध्ये तांत्रिक मनुष्यबळ सेवा पुरविल्याचा तपशिल ( कार्यादेश पत्र क्रमांक,दिनांक,कामगारांची संख्या,कामाचा तपशिल,कामाचे एकुण मुल्य व कामाचा कालावधी इत्यादीचा उल्लेख असावा. त्या ठिकाणाचे काम समाधानकारक असावे.) |
| 15 | निविदाधारकाच्या / संस्थेच्या मागील तीन वर्षात प्रति वार्षिक उलाढाल रुपये ------ कोटी असल्याचे प्राधिकरणाने किंवा चार्टर्ड अकौंटट यांनी नुकतेच निर्गमित केलेले प्रमाणपत्र. |
| 16 | निविदेच्या पृष्ठ क्रमांक वरील मसुदा 500/- मुद्रांक पेपरवर स्वाक्षरीकृत प्रतिज्ञापत्र/ हमीपत्र. |

वर नमूद केलेली अ.क्र. 01 ते 15 ची माहिती पीडीएफ स्वरुपात स्कॅन करुन जोडण्यात यावी.

टिप:

1) जोडलेल्या दस्तऐवजांसाठी (√ ) अशी खुण करावी.

2) उपरोक्त मागविलेल्या माहितीव्यतिरिक्त अनावश्यक माहिती जोडू नये. तसेच सर्व कागदपत्र स्वसाक्षांकित करावेत.

3) या कागद पत्रांच्या मुळ प्रती निविदा उघडण्याच्या वेळी/तपासणीच्या वेळी मागविल्यास उपलब्ध करुन देणे अनिवार्य राहील.

**टिप:- तांत्रिक लिफाफ्यातील पात्र निविदाधारकच वाणिज्यिक लिफाफा उघडणेस पात्र राहील.**

निविदा धारकाची स्वाक्षरी

# वाणिज्यिक लिफाफा (फॉर्म क्र.2)

जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक कार्यालयास कंत्राटी पध्दनतीने शिपाई यांच्या सेवा बाहय संस्थेद्वारे कंत्राटी पध्दतीने पुरविणेकरीता ई-निविदा मध्ये दिलेल्या सुचनांप्रमाणे खालील प्रमाणे दरपत्रक देत आहे.

निविदा धारकाचे नाव व पत्ता :- ------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------

भ्रमणध्वनी / कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक:- ------------------------------------------------------------------------

| अ.क्र. | मनुष्यबळाचा तपशिल | प्रति व्यक्ती दरमहा दर (रुपये | |
|---|---|---|---|
| | | एकत्रित मानधन (रु.) | सेवा शुल्क (सर्व करासह) रु. |
| 1 | कंत्राटी पध्दनतीने शिपाई | ---------------/- | र.रु.-------------/-<br>(अक्षरी --------------मात्र ) |

1. निविदाधारकाने निविदामध्ये नमूद केलेल्या सेवाशुल्क दरांपैकी सर्वात कमी असलेला दर (L1) गृहीत धरण्यांत येईल,तथापि, 0 दर दर्शविणारी निविदा विचारात घेतली जाणार नाही.
2. मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी निश्चित मानधन रक्कम ही नाशिक जिल्हयात सर्व ठिकाणी सारखी राहील व त्यात किमान वेतन कायदा 1948, नुसार देय मानधन व अनुज्ञेय भत्ते तसेच EPF,ESIC इ.रकमांचा समावेश राहील.
3. प्रचलित नियमानुसार शासनास देय असलेले सर्व प्रकारचे कर (TDS, GST इत्यादी) भरणा करण्याची जबाबदारी निविदा धारकाची राहील.

ठिकाण :-
दिनांक :- / /2026

निविदाधारकाची स्वाक्षरी,

(नाव, शिक्का व पुर्ण पत्ता)

# * हमीपत्र *

(रु.500/- बॉंड पेपरवर
तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे)

मी/ आम्ही -------------------- रा.-------------------सत्यप्रतीज्ञेवर हमीपत्र लिहून देतो की,जिल्हाधिकारी नाशिक यांनी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली कंत्राटी पध्दतीने कंत्राटी पध्दनतीने शिपाई पुरविणेबाबतच्या ई-निविदेतील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला /आम्हाला मान्य आहेत.

मी/ आम्ही कुठल्याही शासकीय/निमशासकीय/ खाजगी संस्थेच्या काळया यादीत समावेश नाही.डाटा एंन्ट्री ऑपरेटर पुरवठा निविदेचे अनुषंगाने सादर केलेली सर्व कागदपत्र व माहीती सत्य असून त्यात भविष्यात कोणतीही चूक आढल्यास मी सादर केलेली निविदा अवैध ठरवून संस्था फौजदारी कारवाईस पात्र राहील तसेच वेळोवेळी मागणीप्रमाणे कर्मचारी संख्या पुरविणे, नेमून दिलेले कामे अचूक करणे तसेच कार्यादेश प्राप्त झालेनंतर कामाची हमी म्हणून अंदाजित वार्षिक बिलाच्या रकमेचा 3 % सुरक्षा अनामत रक्कम निविदा मंजूर झाल्यापासुन 08 दिवसाचे आत मी/ आम्ही भरणा करणेची हमी देत आहे/ आहोत.

(निविदाधारकाची सही व नांव)

साक्षीदार:-
(1)
(2)

# प्रपत्र-2

## निविदा सादर करणा-या संस्थेकडे उपलब्ध मनुष्यबळाचा तपशिल

| अ.क्र. | पदाचा (Role) तपशिल | शैक्षणिक अर्हता (Qualification) | उपलब्ध मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|
| 1 | कंत्राटी पध्दनतीने शिपाई | 1) 12 वी.<br>2) ---------------------------------------------------- | |

सोबत शैक्षणिक पात्रतेसह मनुष्यबळाची यादी जोडावी.

निविदाधारकाची सही

(नाव व पत्ता व संपर्क क्रमांक)

# प्रपत्र-1

## निविदा सादर करणार यांनी यापुर्वी मनुष्यबळ पुरवठाबाबत केलेल्या कामांचा तपशिल.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाचे आदेश दिलेल्या कार्यालयाच्या /संस्थेचे नांव | कामाचे स्वरुप | कामाचा कालावधी | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

सुचना :- पुराव्या दाखल छायांकित प्रति जोडाव्यात.

निविदा धारकाची सही
रबर स्टॅम्पसह

| गट -ड , शिपाई पदाकरिता कंत्राटी तत्वावर कर्मचारी यांची वेतन निश्चीती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नियमित वेतन | | | कंत्राटी वेतन | | | वेतनात होणारी बचत |
| 1 | बेसिक | 15000 | 1 | बेसिक | 10021 | 41.35% |
| 2 | महा. भ. (58%) | 8700 | 2 | विशेष भत्ता | 3900 | |
| 3 | HRA (20%) | 3000 | 3 | Employees Configuration to PF | 1671 | |
| 4 | CLA | 65 | 4 | Service charge | 500 | |
| 5 | TA | 675 | | | | |
| | एकुण | 27440 | | एकुण | 16092 | 11348 |

| कंत्राटी वेतन | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| परिमंडळ 1 | | | परिमंडळ 2 | | |
| 1 | बेसिक | 10021 | 1 | बेसिक | 9425 |
| 2 | विशेष भत्ता | 3900 | 2 | विशेष भत्ता | 3900 |
| 3 | Employees Configuration to PF | 1671 | 3 | Employees Configuration to PF | 1599 |
| 4 | Service charge | 500 | 4 | Service charge | 500 |
| | एकुण | 16092 | | एकुण | 15424 |

**गट -ड , शिपाई पदाकरिता कंत्राटी तत्वावर कर्मचारी यांचे मासिक वेतन**

**एकुण भरावयाची पदे ( जि.पु. का. 42 + विभागीय कार्यालय 3 = 45)**

| परिमंडळ 1 -पदे -15 | | | परिमंडळ 2- पदे -30 | | |
|---|---|---|---|---|---|
| | वेतन | एकुण | | वेतन | एकुण |
| एका पदाचे मासिक वेतन | 16092 | 16,092 | एका पदाचे मासिक वेतन | 15424 | 15,424 |
| एका पदाचे वार्षिक वेतन | 16092 X 12 | 1,93,104 | एका पदाचे वार्षिक वेतन | 15424 X 12 | 1,85,088 |
| 15 पदांकरिता वार्षिक वेतन | 193104 X 15 | 28,96,560 | 30 पदांकरिता वार्षिक वेतन | 185088 X 30 | 55,52,640 |
| **15 पदांकरिता 3 वर्षाकरिता लागणारे वेतन अनुदान = अ** | 2896560 X 3 | 86,89,680 | **30 पदांकरिता 3 वर्षाकरिता लागणारे वेतन अनुदान = ब** | 5552640 X 3 | 1,66,57,920 |
| मा. कामगार उपायुक्त नाशिक यांचेकडील शासनाने जाहिर केलेले विशेष वेतनात वर्षातून 2 वेळा विशेष भत्यात होणारी वाढ गृहीत धरूण निवीदा रकमेच्या 10%वाढीव रक्कम समाविष्ट करून 3 वर्षाकरिता येणारी निवीदा रक्कम | 3900 X 10 % | एकुण एकंदर 400/- रू. | अ - विशेष वेतनात अंदाजे 400 रू. प्रति कर्मचारी होणारी वाढ याप्रमाणे 45 कर्मचारी यांची मासिक वाढ | 45000 X 400 | 18,000 |
| | | | अ प्रमाणे 3 वर्षाकरिता 45 कर्मचारी यांच्या विशेष भत्यात 30 महिन्यासाठी होणारी वाढ अंदाजे (मा. कामगार आयुक्त यांच्यापत्रानुसार दि. 1/1/2026 ते30/6/2026 च्या आकडेवारीत विशेष भत्ता वाढ दिलेली आहे) | 18000 X 30 | 5,40,000 |

| | |
|---|---|
| **एकुण निवीदा रक्कम (परिमंडळ 1 व 2 मधील कर्मचारी यांचे 3 वर्षाचे वेतन + विशेष भत्यात होणारी अंदाजे वाढ )** | 89,86,680+1,66,57,920 +5,40,000 = रक्कम रू. 2,58,87,600 /-<br>**( अक्षरी दोन कोटी अठावण्ण लाख सत्याऐंशी हजार सहाशे रू. )** |

## निवीदा शुल्क व बयाणा रक्कम

उदयोग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. 1 डिसेंबर 2016 मधील मुद्दा क्रं. 6.8 चे परिशिष्ठ -8 नुसार निवीदेची किंमत / शुल्क व बयाना रक्कम निश्चीत करण्यात आलेली आहे. सदर निवीदा रक्कम शासन निर्णय 2016 रोजी लागू केली असून वार्षिक वाढ नमुद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदर परिशिष्टात नमुद केलेनुसार निवीदा रक्कमेनुसार गट -ड शिपाई या संवर्गाकरिता खालीलप्रमाणे निवीदा शुल्क व बयाणा रक्कम निश्चीत करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | निवीदा रक्कम | ई. निवीदा शुल्क | वार्षिक वाढ (2016 ते 2026) | वसुल करावयाचे निवीदा शुल्क | बयाणा रक्कम | वार्षिक वाढ | वसुल करावयाची बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2,58,87,600 | 10,000 | 10,000 | 20,000/- | 1,00,000 | 1,00,000 | 2,00,000 |

## सुरक्षा अनामत रक्कम

[illegible] उर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. 1 डिसेंबर 2016 मधील मुद्दा क्रं. 4.6 नुसार निवीदा रकमेच्या 3% सुरक्षा अनामत रक्कम निश्चीत करण्यात आलेली आहे. सदर निवीदा रक्कम शासन निर्णय 2016 रोजी लागू केली असून वार्षिक वाढ नमुद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदर परिशिष्टात नमुद केलेनुसार निवीदा रक्कमेनुसार गट -ड शिपाई या संवर्गाकरिता खालीलप्रमाणे निवीदा शुल्क व बयाणा रक्कम निश्चीत करण्यात येत आहे.

---

निवीदा रक्कम X3% = रू. 2,58,87,600 X 3% = एकुण एकंदर 7,76,630/- रू. परंतु, समितीवरील सर्व सदस्य यांच्यातील चर्चा व अंतिम निकषानुसार भविष्यात शासनाकडून कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाकरिता मुदतीत निधी उपलब्ध न झाल्यास कार्यरत कर्मचारी यांच्या 3 महिन्याच्या वेतनास आवश्यक असणारी रक्कम अंदाजे रू. 25,00,000/- (अक्षरी **-पंचवीस लाख रू. मात्र )इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून निश्चीत करण्यात आली.**

| **परिमंडळ 1 - पदे - 15** | | | **परिमंडळ 2- पदे - 30** | | |
|---|---|---|---|---|---|
| | **वेतन** | **एकुण** | | **वेतन** | **एकुण** |
| एका पदाचे मासिक वेतन | 16092 | 16,092 | एका पदाचे मासिक वेतन | 15424 | 15,424 |
| 15 पदांचे मासिक वेतन | 16092 X 15 | 2,41,380 | 30 पदांचे मासिक वेतन | 15424 X 30 | 4,62,720 |
| 15 पदांचे 3 महिन्याचे वेतन | 241380 X 3 | 7,24,140 | 30 पदांचे 3 महिन्याचे वेतन | 462720 X 3 | 13,88,160 |
| **अ- एकुण** | | 7,24,140 | **ब- एकुण** | | 13,88,160 |
| **अ+ब** | | 21,12,300 | | | |

Signature Not Verified
Digitally signed by GAIKWAD RAMESH
Date: 2026.05.19 17:06:26 IST
Location: Maharashtra-MH